# जाहिर आवाहन

नाशिक महानगरपालिका हददीतील सर्व नागरीकांना जाहिर आवाहन करण्यात येते की,नाशिक महानगरपालिकेने मनपा क्षेत्रात महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम १७४ अन्वये मलनि:सारणच्या मलवाहिका व पावसाळी पाणी वाहून जाण्यासाठी पर्जन्य् जलवाहिनी स्वतत्रपणे टाकलेल्या आहेत.

नाशिक महानगरपालिका क्षेत्रात काही ठिकाणी असे आढळुन आले आहे की, मिळकत धारकांनी पावसाळी पाणी वाहुन नेणा-या लाईनला सांडपाण्याची जोडणी (connection) जोडलेली आहे, सदरचे सांडपाणी पावसाळी लाईनद्वारे नैसर्गिक नाल्यामध्ये प्रवाहीत होते त्यामुळे नाल्याच्या परिसरात दुर्गंधी होऊन आरोग्याचा प्रश्न् निर्माण होतो. तसेच सदरचे सांडपाणी पुढे नाल्याद्वारे नदीपात्रात येत असल्यामुळे गोदावरी/उपनदया प्रदुषित होत आहे.

सबब शहरातील सर्व मिळकत धारकांना आवाहन करण्यात येते की, नाशिक महानगरपालिकेच्या सांडपाणी वाहुन नेणा-या मलवाहिकेला आपले मिळकतीची सांडपाण्याची जोडणी केली आहे याबाबत खात्री करुन घ्यावी व तसे नसल्यास १५ दिवसात आपल्या मिळकतीची सांडपाण्याची जोडणी नजीकच्या महापालिकेच्या सांडपाणी वाहुन नेणा-या मलवाहिकेस जोडुन घ्याव्यात व मनपास सहकार्य करावे.

यामध्ये काही अडचण असल्यास प्रत्येक विभागीय कार्यालयात नेमणुक असलेले उपअभियंता, मलनि:सारण यांचेशी संपर्क करावा. सांडपाणी कनेकशन जोडण्याची रितसर परवानगी घेवून महानगरपालिकेच्या नोंदणीकृत प्लंबरकडुन जोडणी करण्यात यावी.

उपरोक्त् कार्यवाही विहित मुदतीत न झाल्यास संबंधितांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलमान्वये नोटीस देवून कारवाई करण्यावाचून महानगरपालिकेस पर्याय उरणार नाही. तरी कृपया नागरीकांनी महानगरपालिकेच्या या मोहीमेस सहकार्य करुन गोदावरी नदी प्रदुषण मुक्त् करण्यास हातभार लावावा ही विनंती.

आयुक्त्
नाशिक महानगरपालिका, नाशिक